५/५

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

**निवडणूक महत्वाचे**

जा.क्र.रासनिप्रा/परिपत्रक/निवडणूक कार्यालय/३४५/२०१५
दिनांक :२६/०३/२०१५

वाचावे :-

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब
२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ नियम ३

# :- परिपत्रक :-

**विषय :- निवडणूक कार्यालय संस्थेचे मुख्यालय ज्या तालुक्यात असेल तेथे ठेवणेबाबत**

राज्य शासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अधिनियम २०१३, दि.१३ ऑगस्ट २०१३ रोजी प्रख्यापित केलेला असुन सुधारित अधिनियमानुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी राज्य सहकार निवडणुक प्राधिकरण गठित करणेची तरतुद केलेली आहे. त्यानुसार शासन आधिसुचना, सीएसएल-२०१३/प्र.क्रं.१२४/१५-सी दि.३० मार्च २०१३ द्वारे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७३ कब (१) नुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण गठित करण्यांत आले आहे.

प्राधिकरणाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही ठिकाणी प्रशासकीय सोयीसाठी संस्थेचे मुख्यालय एका तालुकयात व निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय दुस-या तालुक्यात ठेवण्यात आले आहे. त्यामुळे संस्थेच्या सभासदांना नामनिर्देशन अर्ज भरताना व इतर अनुषंगिक कामकाजासाठी दूरवर प्रवास करणे, अशा प्रकारच्या गैरसोयीस तोंड द्यावे लागते. त्यामुळे संबंधित संस्थेचे मुख्यालय ज्या तालुक्यात असेल त्याच तालुक्यात निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय असणे आवश्यक आहे.

सदर परिपत्रकान्वंये जिल्हा/तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात येते की, निवडणूक प्रक्रियेतील निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय संबंधित संस्थेचे मुख्यालय ज्या तालुक्यात असेल त्याच तालुक्यात ठेवण्याची दक्षता घ्यावी.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण यांचे आदेशानुसार.**

(डॉ. आनंद जोगदंड)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति.

१. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)
२. तालुका सहकारी निवडणुक अधिकारी (सर्व)